**जागतिक बँक-सहाय्यित "महाराष्ट्रातील जिल्ह्यांमध्ये विकासाला चालना देण्यासाठी संस्थात्मक क्षमता बळकटीकरण प्रकल्प (महास्ट्राईड)"- जिल्ह्यांसाठी प्रोत्साहनात्मक निधी वितरणाची कार्यपध्दती निश्चित करणेबाबत.**

# महाराष्ट्र शासन

## नियोजन विभाग

**शासन निर्णय क्र. :डब्ल्युबीके २०२६/प्र.क्र.३३/का.१४१७**

हुतात्मा राजगुरू चौक, मादाम कामा मार्ग,
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२
**दिनांक** :१५ एप्रिल, २०२६

**संदर्भ :**

१. नियोजन विभाग, शासन निर्णय क्र. डीएपी १०२३/प्र.क्र.९८/का.१४८१, दिनांक २० एप्रिल, २०२३
२. नियोजन विभाग, शासन निर्णय क्र.डब्ल्यूबीके २०२४/प्र.क्र.१३/का.१४१७, दिनांक १४ मार्च, २०२४
३. नियोजन विभाग, शासन निर्णय क्र. डीएपी १०२३/प्र.क्र.९८/का.१४८१, दिनांक १५ मार्च, २०२४
४. नियोजन विभाग, शासन निर्णय क्र.डब्ल्यूबीके२०२४/प्र.क्र.१५०/का.१४१७, दिनांक २४ फेब्रुवारी, २०२५
५. नियोजन विभाग, शासन निर्णय क्र. डब्ल्यूबीके-२०२६/प्र.क्र.३३/का.१४१७ दिनांक १० मार्च, २०२६
६. प्रकल्प अंमलबजावणी कक्ष, महास्ट्राईड, मित्र यांचा ई-मेल दिनांक ०८ एप्रिल, २०२६

**प्रस्तावना**

भारताच्या "आजादी का अमृत महोत्सव" निमित्त, भारत सरकारने देशाला "विकसित राष्ट्र - भारत @२०४७ (India @2047)" बनवण्याचा संकल्प केला आहे. भारताला २०४७ पर्यंत विकसित राष्ट्राचा दर्जा प्राप्त करण्यासाठी, सर्व राज्यांनी देखील पूर्ण विकास साधणे आवश्यक आहे. याद्दष्टीने महाराष्ट्राने स्वत:ची आर्थिक उद्दिष्टे निश्चित केली आहेत. ज्यामध्ये राज्याची अर्थव्यवस्था सन २०२९-३० पर्यंत १ ट्रिलियन डॉलर व सन २०४७ पर्यंत ५ ट्रिलियन डॉलर इतकी करण्याचे उद्दिष्ट आहे. सदरचे उद्दिष्ट साध्य करण्यासाठी, विकास प्रयत्नांचे केंद्रस्थान जिल्हा पातळीवर असणे आवश्यक आहे, ज्यामुळे सर्वसमावेशक आणि शाश्वत वाढीस समर्थन देणाऱ्या लक्षित धोरणांना चालना मिळेल. जिल्ह्यांमधील सामाजिक-आर्थिक विषमता, असमान नैसर्गिक संसाधने आणि वाढत्या शहरीकरणाची आव्हाने लक्षात घेऊन, नियोजन विभागाने प्रत्येक जिल्ह्यासाठी जिल्हा विकास आराखडे (DSPs) तयार करण्यासाठी २० एप्रिल, २०२३ रोजी शासन निर्णय निर्गमित केला.

२. नियोजन विभागाच्या दिनांक १४ मार्च, २०२४ रोजीच्या शासन निर्णयान्वये महास्ट्राईड (MahaSTRIDE) प्रकल्पास मान्यता देण्यात आली आहे.

Proposed Appraisal Document (PAD) च्या परिणाम क्षेत्र १ (Result Area 1) अंतर्गत, जिल्हा विकास आराखड्यात निश्चित केलेल्या कामगिरी निकषांवर (Performance Criteria) जिल्ह्यांचे मूल्यांकन केले जाईल आणि पात्र जिल्ह्यांना प्रोत्साहनात्मक निधी प्राप्त होईल. मंत्रीमंडळाच्या दिनांक २६ फेब्रुवारी,२०२६ रोजी झालेल्या बैठकीत महास्ट्राईड प्रकल्पांतर्गत जिल्ह्यांना प्रोत्साहनात्मक निधी वितरण पद्धतीस मान्यता देण्यात आली असुन याबाबतचा शासन निर्णय स्वतंत्रपणे निर्गमित करण्यात येईल, असे

नियोजन विभागाच्या दिनांक १० मार्च, २०२६ च्या शासन निर्णयात नमूद करण्यात आले आहे. त्यास अनुसरुन महास्ट्राईड प्रकल्पाच्या सुकाणू समितीच्या दिनांक ९ एप्रिल,२०२६ रोजी झालेल्या बैठकीतील निर्णयानूसार सविस्तर मार्गदर्शक सूचनांचा शासन निर्णय निर्गमीत करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

## शासन निर्णय

महास्ट्राईड प्रकल्पांतर्गत जिल्ह्यांना प्रोत्साहनात्मक निधी वितरणाचे निकष व निधी वितरण पध्दतीस मान्यता देण्यात आली आहे.जिल्हा विकास आराखड्याच्या वार्षिक कृती आराखड्याची व परफॉर्मन्स कंडीशन्सची पूर्तता केल्यास जिल्हा विकास आराखड्यांतर्गत वार्षिक कृती आराखडे (AAPs) यशस्वीरित्या राबवणाऱ्या जिल्ह्यांना प्रोत्साहनात्मक निधी देण्यास संदर्भ क्र.५ अन्वये मान्यता देण्यात आली आहे. महास्ट्राईड प्रकल्पाच्या कार्यपुस्तिकेत (Operation Manual) तपशीलवार नमूद केल्याप्रमाणे, कामगिरी निकषांनुसार (Performance Criteria) जिल्ह्यांना प्रोत्साहनात्मक निधी दिला जाईल. जिल्ह्यांच्या कामगिरीचे मूल्यांकन महास्ट्राईड प्रकल्पासाठी नियुक्त केलेल्या स्वतंत्र पडताळणी यंत्रणेव्दारे (Independent Verification Agency - IVA) केले जाईल.

## १. प्रोत्साहनात्मक निधीचे वितरण

**१.१** वार्षिक मूल्यमापनात (Performance Criteria) किमान ६०% गुण मिळवणारे (Composite Score) जिल्हे प्रोत्साहनात्मक निधीस पात्र ठरतील. स्वतंत्र पडताळणी यंत्रणेव्दारे (IVA) वार्षिक मूल्यमापन पडताळणी झाल्यानंतर घोषित केलेल्या पात्र जिल्ह्यांना प्रोत्साहनात्मक निधी वितरीत करण्यात येईल.

मित्र कार्यालयातील महास्ट्राईड प्रकल्प व्यवस्थापन कक्ष (PMU) जिल्ह्यांकडून प्राप्त अहवालांची छाननी करेल आणि प्रकल्प समन्वय समितीला (PCC) प्रस्ताव सादर करेल. त्यानुसार प्रकल्प समन्वय समिती पात्र जिल्ह्यांसाठी प्रोत्साहनात्मक निधी निश्चित करेल.

**१.२** प्रोत्साहनात्मक निधीचे निकष पुढीलप्रमाणे राहतील :-

- ८०% किंवा त्यापेक्षा जास्त Performance Score मिळवणाऱ्या जिल्ह्याला प्रत्येकी १६ कोटी रुपये,
- ७०% पेक्षा जास्त परंतु ८०% पेक्षा कमी Performance Score मिळवणाऱ्या जिल्ह्याला प्रत्येकी १२ कोटी रुपये,
- ६०% पेक्षा जास्त परंतु ७०% पेक्षा कमी Performance Score मिळवणाऱ्या जिल्ह्याला प्रत्येकी ८ कोटी रुपये.

वरीलप्रमाणे दर्शविण्यात आलेल्या गुण पद्धतीचा तपशील **Annexure 1** मध्ये दर्शविण्यात आला आहे.

**१.३** महास्ट्राईड प्रकल्पासाठी नियुक्त केलेल्या स्वतंत्र पडताळणी यंत्रणाद्वारे केल्या जाणाऱ्या वार्षिक मूल्यांकनात किमान ६०% संयुक्त गुण मिळवणारे जिल्हे प्रकल्प समन्वय समितीद्वारे **Annexure 1** मध्ये नमूद केलेल्या कामगिरी अटींनुसार अंतिम निवडीसाठी पात्र ठरतील.

**१.४** हा निधी परिच्छेद २.२.३ मध्ये नमूद केलेल्या उपक्रमांसाठी/प्रकल्पांसाठी वापरला जाऊ शकतो.

## २. जिल्ह्यांसाठी पात्रतेची मार्गदर्शक तत्वे

## २.१ प्रोत्साहनात्मक निधीसाठी पात्रता

**२.१.१** जिल्ह्यांनी त्यांचे मूल्यांकन मापदंडांवरील (महास्ट्राईड प्रकल्पाच्या कार्यपुस्तिकेत नमूद केलेल्या Performance Conditions) प्रगती अहवाल पुढील आर्थिक वर्षाच्या १५ एप्रिलपर्यंत प्रकल्प व्यवस्थापन कक्षाकडे सादर करणे आवश्यक आहे. प्रकल्प व्यवस्थापन कक्ष प्राप्त अहवालांची छाननी करेल आणि ते स्वतंत्र पडताळणी यंत्रणेकडे (IVA) पाठवेल, जी जिल्ह्याच्या पात्रतेचे मूल्यांकन करेल. स्वतंत्र पडताळणी यंत्रणेने केलेले मूल्यांकन अहवाल प्रकल्प व्यवस्थापन कक्षास पाठवेल.

**२.१.२** प्रकल्प व्यवस्थापन कक्षाने पडताळणी केलेले मुल्यांकन अहवाल प्रकल्प समन्वय समितीला सादर करेल, जी पात्र जिल्ह्यांची यादी आणि संबंधित प्रोत्साहनात्मक निधी रक्कम निश्चित करून त्यास राज्य सुकाणू समितीची (State Steering Committee) मान्यता घेईल. तद्नंतर प्रकल्प समन्वय समिती प्रत्येक जिल्हयास प्रोत्साहनात्मक निधीची रक्कम लेखी कळवेल.

## २.२ प्रोत्साहनात्मक निधीच्या वापरासाठी मार्गदर्शक तत्वे

**२.२.१** कामगिरीच्या अटींच्या निकषांनुसार (Performance Conditions) विहित गुण प्राप्त करणाऱ्या जिल्ह्यांना वित्तीय प्रोत्साहनात्मक निधी देण्यात येईल.

**२.२.२** परिच्छेद १.२ मध्ये दर्शविल्यानुसार कामगिरीचे गुण प्राप्त झाल्यावर पात्र जिल्ह्यांना प्रोत्साहनात्मक निधीसाठी महास्ट्राईड प्रकल्पांतर्गत असलेल्या PforR या घटकाच्या अर्थसंकल्पीय तरतुदीतून निधी वितरीत करण्यात येईल.

**२.२.३** पात्र जिल्ह्यांना प्रोत्साहनात्मक निधीचा वापर खालील नमूद केलेल्या बाबींवर करता येईल :

- जिल्हा विकास आराखड्या अंतर्गत असलेले Interventions.

आणि/किंवा,

- भारत सरकारच्या 'मिशन लाईफ' (पर्यावरणासाठी जीवनशैली) अभियानाशी सुसंगत असलेले प्रकल्प.
- आर्थिक वाढ आणि शाश्वत विकासाला चालना देणारे इतर प्रकल्प.
- खाजगी भांडवल आकर्षित करण्याच्या दृष्टीकोनातून आवश्यक असलेल्या खालील बाबी :
  (i) ऊर्जा-कार्यक्षम प्रक्रिया आणि पद्धतींसाठी,
  (ii) विद्यमान सांडपाणी प्रक्रिया सुविधा सुधारण्यासाठी/दुरुस्त करण्यासाठी,
  (iii) पुनर्वापरासाठी SOPs (प्रमाणित कार्यप्रणाली) विकसित करण्यासाठी
  (iv) स्टार्टअप्स आणि उदयोन्मुख तंत्रज्ञानाद्वारे नवकल्पनांना चालना देण्यासाठी.
  (v) स्थानिक स्वराज्य संस्थांना पुढे नमूद केलेल्या बाबींमध्ये सहाय्य देण्यासाठी –
  अ) विकेंद्रित कचरा व्यवस्थापनाचे पद्धतीकरण ( Systemizing Decentralized waste management)
  ब) वन्यजीव संवर्धन उपक्रम (Wildlife Conservation Activities)
  क) इको-सिस्टीम सेवांचे पुनरुज्जीवन (Rejuvenating Eco-System Services)
  ड) पर्यावरणपूरक पर्यटन (ecotourism) आणि/किंवा साहसी पर्यटनाला चालना देणे (सुलभ, सुरक्षित आणि सर्वसमावेशक बनवून)

**२.२.४ वगळलेल्या बाबी (Exclusions)** — हा प्रोत्साहनात्मक निधी मोठी आणि मध्यम स्वरूपाची स्थापत्य कामे आणि प्रशासकीय खर्चासाठी (जसे की संगणक खरेदी इ.) वापरता येणार नाही. या अंतर्गत ज्यांचा पर्यावरणावर महत्वपूर्ण, संवेदनशील, विविध किंवा अभूतपूर्व प्रतिकूल परिणाम होण्याची शक्यता आहे किंवा ज्यांचा नागरीकांवर प्रतिकूल परिणाम होऊ शकतो अशा कृती वगळण्यात आल्या आहेत. वगळलेल्या बाबींमध्ये (परंतु इतकेच मर्यादित नाही) खालील बाबींचा समावेश होतो :

- केंद्र आणि राज्याच्या पर्यावरणीय आणि सामाजिक कायद्यांशी विसंगत असलेले उपक्रम.
- जमिनीच्या वापरात किंवा जमीन आणि/किंवा नैसर्गिक संसाधनांच्या उपलब्धतेमध्ये मोठ्या प्रमाणावर बदल.
- मोठ्या भौगोलिक क्षेत्रांना व्यापणारे प्रतिकूल पर्यावरणीय आणि सामाजिक परिणाम, ज्यात सीमापार परिणाम किंवा ग्रीनहाऊस वायू (GHG) उत्सर्जनासारखे जागतिक परिणाम समाविष्ट आहेत.
- कोणतेही भूसंपादन, सक्तीचे स्थलांतर आणि/किंवा सक्तीच्या पुनर्वसनाचे परिणाम.
- महत्वपूर्ण नैसर्गिक अधिवास किंवा महत्वपूर्ण सांस्कृतिक वारसास्थळांचे महत्वपूर्ण रूपांतर किंवा ऱ्हास.
- जंगले, अधिसूचित पाणथळ जागा किंवा पर्यावरण-संवेदनशील क्षेत्रांचे रूपांतर किंवा अतिक्रमण आणि/ किंवा सर्व संरक्षित/वन क्षेत्रांच्या (राष्ट्रीय उद्याने, वन्यजीव अभयारण्ये आणि कॉरिडॉर) आणि पर्यावरण, वन आणि हवामान बदल मंत्रालय, भारत सरकार द्वारे अंतिम किंवा मसुदा अधिसूचना प्रकाशित केलेल्या पर्यावरण-संवेदनशील क्षेत्रांच्या आत बांधकाम.
- विशेषतः अनुसूची-५ क्षेत्रांमधील स्थानिक लोक/आदिवासी लोकसंख्या किंवा त्यांच्या प्रदेशांवर प्रतिकूल परिणाम करणारी कोणतीही कृती.
- मुक्त माहितीपूर्ण पूर्व संमती (FIPC) आवश्यक असणारे उपक्रम.
- भारतीय पुरातत्व सर्वेक्षण (ASI) ने निश्चित केलेल्या संरक्षित स्मारकांच्या १००-मीटर त्रिज्येमध्ये बांधकाम किंवा पाडकाम आणि अशा रचनांच्या ३००-मीटर त्रिज्येमध्ये पूर्वपरवानगीशिवाय बांधकाम.
- 'ॲस्बेस्टोस-युक्त साहित्य' समाविष्ट असणारे बांधकाम आणि/किंवा नूतनीकरण.
- महाराष्ट्र शासन/भारत सरकारच्या नियमांनुसार शस्त्रे, अल्कोहोल, किरणोत्सर्गी सामग्री, कोणत्याही प्रतिबंधित आणि/किंवा बेकायदेशीर उपक्रमांच्या निर्मिती, जाहिरात आणि/किंवा खरेदीमध्ये गुंतणे.
- सक्तीची किंवा बालमजुरी आणि कामाच्या ठिकाणची अशी परिस्थिती समाविष्ट असणारे उपक्रम ज्यामुळे कामगारांच्या आरोग्य आणि वैयक्तिक सुरक्षिततेला मोठा धोका निर्माण होतो.

**२.२.५** प्रोत्साहनात्मक निधीच्या विनियोगासाठी जिल्हाधिकाऱ्यांच्या अध्यक्षतेखाली जिल्हा कार्यकारी समितीची स्थापना केली जाईल. या समितीत खालील सदस्यांचा समावेश असेल :-

| अ.क्र. | पदनाम | समितीमधील पदनाम |
|---|---|---|
| १ | जिल्हाधिकारी | अध्यक्ष |
| २ | उपायुक्त, जिल्हा सांख्यिकी कार्यालय | सदस्य |
| ३ | महाव्यवस्थापक (जिल्हा उद्योग केंद्र) | सदस्य |
| ४ | जिल्हा कृषी अधीक्षक | सदस्य |
| ५ | कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग | सदस्य |
| ६ | कार्यकारी अभियंता, जलसंपदा विभाग/ मृद व जलसंधारण विभाग | सदस्य |
| ७ | जिल्हा नियोजन अधिकारी | सदस्य सचिव |

उपरोक्त समितीतील सदस्यांव्यतिरिक्त आवश्यकतेनूसार इतर जिल्हास्तरीय अधिकारी यांना निमंत्रक म्हणून उपरोक्त समितीच्या बैठकीस बोलावण्याचा अधिकार संबंधित जिल्हाधिकारी यांना असेल.

**<u>समितीची कार्ये</u>**

- प्रोत्साहनात्मक निधीतून जिल्हास्तरीय कामांची निवड तसेच सदर कामांना वित्तीय आणि प्रशासकीय मान्यता देण्याचे अधिकार या समितीला असतील.
- सक्षम प्राधिकारी यांची तांत्रिक मान्यता घेणे आवश्यक राहील.

**२.२.६** प्रोत्साहनात्मक निधीच्या विनियोगाच्या प्रस्तावांमध्ये खालील बाबींचा समावेश असणे आवश्यक आहे:

- खर्चाचे अंदाजपत्रक (Cost Estimate)
- अपेक्षित निष्पत्ती (Expected outputs)
- प्रमुख परिणाम (Key outcomes)
- अंमलबजावणीची कालमर्यादा (Implementation Timeline)

## २.३ निधीच्या वापराची कार्यपद्धती

**२.३.१** जिल्हा विकास आराखड्याच्या वार्षिक कृती आराखड्याची व परफॉर्मन्स कंडीशन्सची पूर्तता केल्यास संबंधित जिल्ह्यांस प्रोत्साहनात्मक निधी निकषाप्रमाणे मंजूर करण्याचा त्याप्रमाणे निधी वितरण महास्ट्राईड प्रकल्पातून करण्याचा अधिकार महास्ट्राईड प्रकल्पांतर्गतच्या प्रकल्प समन्वय समितीला असतील.

**२.३.२** प्रस्तावाच्या मूल्यांकनावर आधारित, मुख्य कार्यकारी अधिकारी, मित्र (CEO, MITRA) यांच्या अध्यक्षतेखालील प्रकल्प समन्वय समितीकडून प्रत्येक जिल्ह्यासाठी देय प्रोत्साहनात्मक निधी निश्चित करण्यात येईल.

**२.३.३** जिल्हा कार्यकारी समितीने मंजूर केलेल्या कामांसाठी निधीची मागणी जिल्हाधिकारी प्रकल्प व्यवस्थापन कक्षास करतील. त्यानुसार प्रकल्प व्यवस्थापन कक्षाकडून निधीचे वितरण करण्यात येईल.

## २.४ संनियंत्रण आणि अनुपालन (Monitoring & Compliance)

**२.४.१** जिल्ह्यांनी प्रकल्प व्यवस्थापन कक्षाकडे त्रैमासिक प्रगती अहवाल सादर करणे आवश्यक आहे, यामध्ये खालील माहितीचा समावेश असेल :

- निधीचा वापर
- वार्षिक कृती आराखड्यांमध्ये मंजूर केलेल्या लक्ष्यांच्या तुलनेत प्रगती
- आव्हाने आणि उपाय योजना

**२.४.२** जिल्ह्यांनी प्रत्येक आर्थिक वर्षाच्या सुरुवातीला वार्षिक उपयोगिता अहवाल (Annual Utilization Report) सादर करणे आवश्यक असून, लेखापरीक्षण करण्याची जबाबदारी जिल्ह्यांची असेल.

**२.४.३** जिल्ह्यांसाठी प्रोत्साहनात्मक निधी मंजूर करणे व वितरण करणे याबाबत संनियंत्रण करण्याची जबाबदारी महास्ट्राईड प्रकल्प व्यवस्थापन कक्षाकडे असेल.

## २.५ अर्थसंकल्पीय तरतूद

जिल्हा प्रोत्साहन निधी अंतर्गत होणारा सर्व खर्च "मागणी क्र. ओ ०७ (००) (०४), महाराष्ट्र जिल्हास्तरीय विकासाला चालना देण्यासाठी संस्थात्मक सक्षमीकरण प्रकल्प - महास्ट्राईड (फलश्रुती आधारीत कार्यक्रम) जागतिक बँक हिस्सा ७० टक्के (कार्यक्रम) ३४५१ए२३३" या लेखाशिर्षाखालील मंजूर तरतुदीतून भागविण्यात यावा तसेच संदर्भ क्र. ४ येथील नियोजन विभागाच्या दिनांक २४ फेब्रुवारी, २०२५ मधील तरतुदींनूसार निधी वितरणाबाबत कार्यवाही करण्यात यावी.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असुन त्याचा संगणक संकेतांक २०२६०४१५१७३०२१८३१६ असा आहे. हा शासन निर्णय डिजिटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांचे आदेशानुसार व नावाने,

MILIND RAGHUNATH KULKARNI

Digitally signed by MILIND RAGHUNATH KULKARNI
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=PLANNING DEPARTMENT,
2.5.4.20=438FA70BB728385B5C81BDE24450C11D5CE0D99ED18A61FB5B1685722E2C2C03, postalCode=400032, st=Maharashtra,
serialNumber=DB6FB8A1DB6A8793024B0C8728EB79AB35DD0CAE14DDA9621D73EA4347C7856A, cn=MILIND RAGHUNATH KULKARNI
Date: 2026.04.15 17:34:50 +05'30'

**(मिलिंद कुळकर्णी)**
**उप सचिव, महाराष्ट्र शासन**

प्रति,

१. मा. राज्यपाल, महाराष्ट्र राज्य यांचे प्रधान सचिव, राजभवन, मुंबई,
२. मा. सभापती, महाराष्ट्र विधानपरिषद, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई,
३. मा. अध्यक्ष, महाराष्ट्र विधानसभा, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई,
४. मा. विरोधी पक्षनेता, विधानपरिषद/विधानसभा, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई,
५. मा. उप सभापती, महाराष्ट्र विधानपरिषद, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई,
६. मा. उपाध्यक्ष, महाराष्ट्र विधानसभा, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई,
७. सर्व सन्माननीय सदस्य, विधानपरिषद/विधानसभा, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई,
८. मा. मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य यांचे अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव, मंत्रालय, मुंबई,
९. मा. उप मुख्यमंत्री (नगरविकास, गृहनिर्माण, सार्वजनिक बांधकाम (उपक्रम), यांचे सचिव, मंत्रालय, मुंबई,
१०. मा. उप मुख्यमंत्री (राज्य उत्पादन शुल्क, क्रीडा, व युवक कल्याण, अल्पसंख्खाक आणि औफाक), यांचे सचिव, मंत्रालय, मुंबई,
११. सर्व मा. मंत्री महोदय यांचे खाजगी सचिव,
१२. सर्व मा. राज्य मंत्री यांचे खाजगी सचिव,
१३. मा. महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र, मुंबई/नागपूर,
१४. मा. महालेखापाल (लेखा परीक्षा), महाराष्ट्र, मुंबई/नागपूर,
१५. मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र इन्स्टिट्यूशन फॉर ट्रान्सफॉर्मेशन (मित्र), मुंबई,
१६. सर्व मंत्रालयीन विभागाचे अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव,
१७. प्रधान सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय (विधानपरिषद), विधानभवन, मुंबई,
१८. प्रधान सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय (विधानसभा), विधानभवन, मुंबई,
१९. महासंचालक, माहिती जनसंपर्क संचालनालय, मंत्रालय, मुंबई,
२०. मा. मुख्य सचिव यांचे सह सचिव, मुख्य सचिवांचे कार्यालय, मंत्रालय, मुंबई,

२१. सर्व विभागीय आयुक्त,
२२. सर्व जिल्हाधिकारी,
२३. सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषदा,
२४. सह सचिव/उप सचिव/अवर सचिव, नियोजन विभाग, मंत्रालय, मुंबई,
२५. निवडनस्ती, कार्यासन १४१७, नियोजन विभाग, मंत्रालय, मुंबई

**Annexure 1 – Performance Conditions**

| # | Performance Condition | Weight | Year 1 (2025-26) | Year 2 - 5 | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | **Achievement of 2024-25 AAP** | **Achievement of Annual Action Plan (AAP)** | | | |
| a) | Interventions identified in the Annual Action Plans of DSP completed (Note: Completion of intervention to be measured by achievement of 100% of associated physical targets) | | | <20% of interventions completed | >=20% to < 40% of interventions completed | >= 40% to <60% of interventions completed | >= 60% of interventions completed |
| | Weight/ Target Score | 45% | | 0 | 0.3 | 0.6 | 1 |
| b) | Increase in mobilization of private capital/ credit for funding Annual Action Plan of DSPs | | *Baseline will get established* | Decrease in annual increase | Over Y0: | Over Y0: | Over Y0: |
| | | | | | Category II: < 2% annual increase; | Category II districts: >= 2% to <4% annual increase; | Category II districts: >= 4% annual increase; |
| | | | | | Category I districts: < 1% annual increase | Category I districts: >= 1% to <2% annual increase | Category I districts: >= 2% annual increase |
| | Weight/ Target Score | 25% | | 0 | 0.3 | 0.6 | 1 |

| # | Performance Condition | Weight | Year 1 (2025-26) | Year 2 - 5 | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | Achievement of 2024-25 AAP | Achievement of Annual Action Plan (AAP) | | | |
| c) | Leveraging funds of District Annual Plan (General) for subsectors highlighted in Annual Action Plan of DSPs (minimum 25% mandate) | | *Baseline will get established* | Decrease in annual points increase | Over Y0, < 3% points annual increase | Over Y0, >= 3% to <5% points annual increase | Over Y0, >= 5% points annual increase |
| | Weight/ Target Score | 20% | | 0 | 0.3 | 0.6 | 1 |
| d) | Public Disclosure of the Action Plans on the district website | | | Action Plan not disclosed on website | Action Plan disclosed on website | | |
| | Weight/ Target Score | 10% | | 0 | 1 | | |

This table is explained in detail as below

**Performance Condition a) Interventions identified in the AAPs of DSP completed**

"Interventions" refer to deliberate steps or measures implemented to address a specific issue, challenge, or situation. In the context of the DSP, interventions refer to specific steps taken for the accomplishment of the district's growth objectives. Multiple interventions may be required to achieve a single objective. The interventions evaluated under this performance condition will be from amongst the specific interventions identified in approved Annual Action Plan (AAP).

"Physical targets" refers to the measurable, tangible results associated with any intervention. For example, in the intervention, "soft skill development of 200 employees in tourism sector", the measurable target '200 employees' is a physical target.

Under this performance condition, districts will receive a score depending on completion of the proportion of interventions of AAP. Only those interventions with physical targets associated to them will be considered for the evaluation.

As per the scoring matrix, in each FY, districts will receive:

| **Interventions completed** | <20% | 20-40% | 40-60% | >60% |
|---|---|---|---|---|
| Marks received | 0 | 0.3 | 0.6 | 1 |

The weight assigned to this condition is 45%.

**Performance condition b) Increase in mobilization of private capital for funding AAP of DSPs**

Mobilizing private capital is crucial for achieving sustainable and inclusive development goals. Public funds alone are insufficient to meet the vast financial needs. It therefore becomes necessary to leverage private investment especially to see progress in areas like infrastructure, healthcare, and education. The utilization of public-private partnerships, financial contracts for sustainable development, and similar tools, can close the financing gap.

Multilateral development banks have defined private capital mobilization (PCM) as investment by a private entity, which is defined as a legal entity that is (i) carrying out or established for business purposes and (ii) financially and managerially autonomous from national or local government. PCM by the public sector for financing interventions of AAP of a DSP can take forms of co-financing, co-investment, public-private partnerships (PPPs) and more. However, philanthropic and CSR funds are excluded from this.

In the AAP of DSPs, districts have identified the funds required to complete their interventions, as well as the sources for these funds. Additionally, districts have identified financing gaps. These gaps should be addressed through PCM to realize the objectives of the interventions.

For this performance condition, districts have been categorized into category I and category II districts based on analysis of commercial electricity consumption data.

| Category I Districts | | Category II Districts | | | |
|---|---|---|---|---|---|
| 1 | Mumbai City | 1 | Gondia | 13 | Buldhana |
| 2 | Mumbai Suburban | 2 | Yavatmal | 14 | Solapur |
| 3 | Thane | 3 | Chandrapur | 15 | Sangli |
| 4 | Raigad | 4 | Washim | 16 | Hingoli |
| 5 | Palghar | 5 | Gadchiroli | 17 | Latur |
| 6 | Pune | 6 | Dharashiv | 18 | Parbhani |
| 7 | Satara | 7 | Nandurbar | 19 | Beed |
| 8 | Jalna | 8 | Wardha | 20 | Nanded |
| 9 | Chhatrapati Sambhajinagar | 9 | Ahmednagar | 21 | Ratnagiri |
| 10 | Kolhapur | 10 | Bhandara | 22 | Sindhudurg |
| 11 | Nashik | 11 | Amravati | 23 | Jalgaon |
| 12 | Nagpur | 12 | Akola | 24 | Dhule |

The scoring criteria for this district will be based on the increase in private capital mobilization as follows:

| | **0 marks** | **0.3 marks** | **0.6 marks** | **1 mark** |
|---|---|---|---|---|
| Category I (increase in PCM) | <=0 | 0 - 1% | =1% to 2% | >= 2% |
| Category II (increase in PCM) | <=0 | 0 - 2% | =2% to 4% | >= 4% |

The weight assigned to this condition is 25%.

**Performance condition c) Increase in utilization of District Annual Plan (General) funds for financing Annual Action Plans of DSPs**

Districts are annually provided with a budget by the Planning Department under the District Annual Plan (DAP). Districts can allocate funds from this budget to finance works/services through schemes approved by the departments. Reviews of these funds have shown underutilization of schemes in key sectors, and reappropriation of funds away from schemes they are initially allocated to. To ensure smooth progress along the district-led growth plans, the GoM mandated vide Planning Department GR no. D.A.P.-2023/Pr.Kr.98/Ka.1481 that districts must allocate 25% of the DAP budget towards schemes in those subsectors that have been highlighted on the AAPs of DSPs.

This performance condition requires that districts increase the proportion of the district annual plan allocated towards focus subsectors annually.

Therefore, a district that spent 25% of the DAP towards focus subsectors in Year 1 will receive:

| **Increase in DAP funds spent on DSP** | <=0% | <3% | >= 3% to <5% | >= 5% |
|---|---|---|---|---|
| Marks received | 0 | 0.3 | 0.6 | 1 |

The weight assigned to this condition is 20%.

**Performance condition d) Making the DSP Public**

Under this performance condition, districts are encouraged to publicly disclose their approved annual action plan of a DSP for the year on the district websites. This would increase accountability for the completion of the annual action plan.

Any district that discloses their annual plan via the district website will receive a score of 1 mark. Districts that do not disclose their annual plan via the district website will receive a score of 0.

| **Public disclosure** | **AAP not disclosed** | **AAP disclosed** |
|---|---|---|
| Marks received | 0 | 1 |

This condition has been given a weight of 10%.